GRT

Golden Research Thoughts

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

# ग्रामीण कांदबरी :- १९४७-१९७५

**Sanjivani Mule Pawar**
M.A. M.Phil. , Marathi Teacher , Chhatrapati Shivaji School Solapur.

**प्रस्तावना**

१९४७-१९७५ या कालखंडातील कांदबरीतील ग्रामीण संवेदनेतून, ग्रामीण जीवनानुभवांच्या प्रेरणेतून निर्माण होणाऱ्या कृतीमागील प्रेरणा आणि त्यांची काही निरीक्षणे या लेखात मांडावयाची आहेत.

१९४५ हा लेखाचा आरंभ कालखंड आहे. म्हणजे या सुमारापासून निर्माण झालेल्या कांदबरीची प्रेरणा ही नेमकी त्यांच कालबिंदूची नाही, नसतेसुध्दा, हे ध्यानात घ्यायला हवे. आधीच्या ग्रामीण साहित्यातूनसुध्दा या साहित्याला प्रेरणा मिळालेली असणार हे नाकारता येत नाही. म. गांधीजीनी "खेडयाकडे चला" ही हाक या काळापर्यंत जुनी झाली होती. शिक्षण घेत असलेली खेडयातील पिढी १९४०-५० च्या दशकात लिहू लागलेली होती. त्या पिढीला अस्सल, कमअस्सल, कलात्मकता, अभिजातता या विशेषांची ओळख पटत चालली होती. या विशेषांच्या जाणिवांमधून ग्रामसंस्कृतीच्या भरघोस विशेषांची अनुभूती येताना जाणवत राहते. दुसरी एक गोष्ट अशी की, स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण कादंबरी काहीशी विचार करायला लावणारी आहे. अर्थात, तिच्यात व्याजोक्ती आहे. पण तो साहित्यामधीलच एक विशेष समजला तर व्याजोक्तीची संशयसूट देता येईल. उदाहरण म्हणून या कालखंडातील सरसकट सर्व कांदबऱ्या सांगता येतील. काही अपवाद आहेत. त्या अपवादाची थोडक्यात चर्चा इथे अपेक्षित आहे.




या कालखंडाचा उगवता क्षितिज "बनगरवाडी" सांगता येईल. बनगरवाडीने नागर जीवनाला वाडीवरची "धनगरी संस्कृती" कलात्मक रित्या सांगितलेली आहे. लेखकाची इथे मात्र फसगत झालेली दिसते. लेखकाने ग्रामजीवनांचे आहे. लेखकांने ग्रामजीवनांचे प्रत्ययकारी दर्शन घडविले आहे, परंतु शेळया मेंढया आणि मेंढपाळ धनगर हे केवळ पार्श्वभूमीला घेतलेले आहे. वास्तवाचे यथार्थ चित्रणकारी कादंबरी नेमके काय देते, असा प्रश्न पडतो तेव्हा अभिजात वृत्तीने निर्लेपपणाने व तटस्थ निवेदन करणाऱ्या कथन शैलीचे अत्यंत मनोज्ञ दर्शन बनगरवाडीत घडते. कांदबरी शेळया मेंढया, त्यांचे आजार, प्रवृत्ती, बनगरवाडीत सर्व धनगर दाखवूनही त्यांची कोणताही संस्कृती दाखविण्यात लेखक अयशस्वी ठरला आहे. परंतु कांदबरीच्या व्यस्त कल्पनेतील आशय अत्यंत सकसपणे व्यक्त झाला आहे. बनगरवाडी रान जागे करणाऱ्या आणि असहाय, हतबल माणसांना धूर्त, कुलंगी, मस्तवाल प्रवृत्तीसह नाटय जिवंत करणारी आहे. कमी पाऊसमान, प्रदेशांतील खुरटे गवत, तशीच पिके आणि तिथल्या माणसांचे जगणे माडगूळकरांनी चित्रांकित केले आहे.

१९४० नंतरचा कालखंड लघुकथेने भारावून टाकलेला कालखंड आहे. माडगूळकर या कालखंडातील एक सिध्दहस्त कथाकार त्यांच्या कथेने माडगूळकर परिसरातील माणसांसकट शिवाराला जिवंतपणा आणला आहे. त्यांची कथा एकेक माणसाच्या दैन्यावर, दारिंद्रयावर चित्रित केलेली डॉक्युमेंट्री वाटते. हाच प्रभाव त्यांच्या कांदबरीवर दिसून येतो. त्यामुळे माडगूळकरांनी बनगरवाडीची कमी, राजाराम मास्तराची जास्त वाटते. माडगूळकरांनी ग्रामीण प्रदेशासह साध्या बोलीला लसलशीत असे रुप दिल्याने त्यांच्या निवेदनात काव्य फुलते, हे ध्यानी येते. बनगरवाडी कादंबरीत अख्ख्या दिवसभराची दैनंदिनी येते. तसे बनगरवाडीत द्रष्टेपणसुध्दा प्रकटले आहे. शाळेत येणाऱ्या मुलांना खायला कोण देणार ? हा एका साध्या खेडुतांचा प्रश्न कांदबरीत उपस्थित झाला आहे. पुढे १९७० च्या दशकांच्या उत्तरार्धात विद्यार्थ्यांना पूरक आहार सुरु झाला. हा या कांदबरीचा द्रष्टेपणाच म्हणायला पाहिजे.

म. गांधीच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या जागतिक परिस्थितीवर माडगूळकरांनी वावटळ कादंबरी लिहून ग्रामजीवनातील तणाव, जातीय भयग्रस्त वातावरण, माणुसकीचा चिवटपणा दाखविला आहे.

सोलापूरच्या विरुध्द टोकाला असलेले अहमदनगर जिल्हयातील ग्रामजीवन वा.दिघे जगासमोर आणत होते. त्यांनी निसर्गाचे मनोहारी रुपदर्शन दिले. त्यांच्या चित्रणात रसरशीतपणा आहे. "निसर्गकन्या रानजाई", "गानलुब्धा गगनायना", "आई आहे शेतात", "पड रे पाण्या" या कादंबऱ्या महत्वाच्या वाटतात. दिघ्यांनी जीवन दर्शनाबरोबर व्यक्तिदर्शन महत्वाचे मानले. केवळ ग्रामीण जीवनानुभव हीच दिघ्यांची प्रेरणा राहिली. दिघ्यांच्या कादंबऱ्यांत ग्रामजीवनातील रागलोभ, भांडण, प्रेम, हेवेदावे इ. अनेक बाबी वर्णिल्या आहेत. ग्रामरचना आणि शेती हा केंद्रबिंदू दिघ्यांच्या कथनाचा विशेष असतो. त्यासाठी पुतळाबाईंचे ५७ तोळे सोने संपलेले आहे. कुळ कायदा आला आणि या कायद्यामुळे बंधूजी आणि तातू यांच्यात वैर निर्माण झाले. तुकाराम आणि जिजा यांचे भांडण, यांचा फायदा घेणारी गावातील खलप्रवृत्ती हे सर्व दिघे जिवंत करतात. दिघे रक्ताच्या नात्यामधील ओलावा दाखविण्यासही विसरत नाहीत. एकीकडे ग्राम जीवनातील शेतीला, जमीन जुमल्याला घेऊन भावकी वाढीस लागते. परंतु अजून एक ओला अदृश्य

भावनेचा पाझर असतोच हे दिघ्यांनी दाखवून दिले आहे. कार्तिकी कांदबरीतून त्यांनी ग्रामजीवनातील अस्पृश्यता स्पष्ट केली आहे. हेरंबा आणि कार्तिकी यांची प्रेमकथा या कादंबरीचा विषय, पण ती कथा सफल झाली का, हा प्रश्न पडतो. दिघ्यांना अस्पृश्यतेच्या मुळांशी पोहोचता आले नाही आणि त्यातील भयंकर दाहकताही दाखवता आली नाही, पण अस्पृश्य, कातोडी, ठाकूर अशा सामाजिक लांछनास कलात्मकरीत्या मुखर केले आहे. "दिघ्यांनी मध्यमवर्गीय जीवनचित्रणात अडकलेल्या मराठी कादंबरीला आशयाच्या अंगाने नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. त्यांची रम्याद्भुतप्रिय लेखन प्रकृती त्यांना भेदक वास्तवापासून दूर नेत होती. परिणामी दिघ्यांच्या कांदबरीत वास्वतवादी आणि रोमँटिक अशा दोन्ही प्रवृत्तींची सरमिसळ झालेली दिसून येते. तसेच मध्यमवर्गीय अभिरुची प्रमाण मानून लेखन केल्याने त्यांच्या जीवनचित्रणात प्रदर्शनात्मक शिरली, हेच खरे. (रवींद्र ठाकूर:१९९३:५७)"

बी. रघुनाथांची "आडगावचे चौधरी"(१९५४) चौधऱ्यांच्या पिढयांची कहाणी सांगणारी आहे. मराठवाडयात चौधऱ्यांचे राज्य होते. हे जुलमी होते ते निदर्यपणे सामान्यांच्या जीवनाशी खेळत, संपत्ती कशीही गोळा करत. अशा निष्ठुर, निर्दयी चौधऱ्यांच्या जुलमांची कहाणी, आडगावचे चौधरी मध्ये प्रत्ययकारी केली आहे. म.भा. भोसले यांनी उघडया जगात, एका आईची लेकरे, घसरगुंडी या महत्त्वपूर्ण कादंबऱ्या लिहिल्या. उघडया जगात चे कथानक कृत्रिम वाटते. अध:पतन, रक्तसंबंध यासारखे विषय भोसले यांनी हाताळले आहेत. ग्रामीण संस्कृतीला शहरी संस्कृतीची लागलेली ओढ त्यांच्या कादंबऱ्यांत दिसून येते. आम्ही खेडवळ माणसे ही रघुवीर सामंतांची सामान्य कथानक असलेली रेखीव कांदबरी आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हळूहळू कोणत्या सुधारणेकडे राज्य जात आहे यांची चुणूक वि.वा. हडपांच्या अन्नदाता उपाशी या कांदबरीतून लक्षात येते. या ग्रामीण कादंबरीत मार्क्सवाद आहे. जुलूम असहय झाल्यानंतर शेतकरी जमीनदाराचा खून करतो. अशा वादामुळे ग्रामीण कादंबरीने अभ्यासकांचे लक्ष आपल्याकडे आकृष्ट करुन घेतले. या सुमारास झालेले वा. ब.कर्णिक, विभावरी शिरुरकर, बा.भ. बोरकर, शांता शेळके यांचे कादंबरी लेखन उल्लेखनीय आहे. या कालखंडात बनगरवाडी ही आदर्शवत कादंबरी निर्माण झाली. बाकीच्या तिच्या परिसराच्या लांबच राहिल्या.

१९५० च्या दशकांत प्रादेशिक कादंबरीने जोर धरला होता. श्री.ना. पेंडसे प्रादेशिक कादंबरीकरांचे अध्वर्यू म्हणायला हरकत नाही. एल्गार, हद्दपार, गारंबीचा बापू, हत्या, कलंदर, रथचक्र या पेंडशांच्या महत्वाच्या कादंबऱ्या आहेत. दापोली, मुर्डी, हर्णे, आंजर्ले परिसरातील कोकणचा निसर्ग, मानवी जीवनशैली पेंडशांनी आपल्या कादंबऱ्यांत आविष्कृत केल्याने प्रादेशिक कादंबरीकार होण्याचा मान त्यांना लाभला. साखर पेंडीतील रघु आणि कादर यांची सुशील प्रेमकथा, विद्यार्थ्यांच्या मनावर अनेक परींनी संस्कार घडविणारे राजेमास्तर, ब्राम्हणी संस्कारांच्या दबावाखाली जगणारा, पण त्यातून बाहेर पडू पाहणारा पौगंडावस्थेतील मुलगा, राधा-बाबू-विठोबा-दिनकर अशा प्रौढ व्यक्तिरेखांनी पेंडशांचे कादंबरीविश्व बनले आहे. गारंबीचा बापू ही गाजलेली कादंबरी प्रादेशिकतेच्या विषयी संशय निर्माण करणारी आहे. रंजन हाच तिचा गाभा आहे.

रंजन करण्याची सर्व प्रकारची सामग्री पेंडशांनी या कादंबरीत वापरलेली आहे. हिचा हिशेब एवढाच, की वास्तवाचे चित्रण करणारी ही एक कलात्मक कादंबरी आहे, असा चकवा निर्माण करण्यात ही बरीचशी यशस्वी ठरली. तिने वास्तव जीवनाचा फुटकळ तपशील आकर्षकपणे पुरविला. परंतु गाभा मात्र स्वप्नरंजनाचाच ठेवला. (गो.मा.पवार:१९८१ पृ.२) पेंडशांच्या कादंबऱ्यात कोकणी प्रदेश कोकणी माणसाच्या स्वभावासह उतरलेला आहे. रथचक्र मध्ये कोकणचे विशेष दर्शन घडते. यामध्ये कोकणामधील जुन्या वळणाच्या मध्यमवर्गीय ब्राम्हण कुटुंबातील एका सामान्य स्त्रीची शोकांतिका आहे. जन्म ते मृत्यु असा तिच्या दुर्दैवाचा फेरा यामध्ये दाखविला आहे. पेंडशांच्या कादंबऱ्यांवर एक आक्षेप घेण्यात आला आहे, की त्यांची कादंबरी कौटुंबिकतेच्या पलीकडे जात नाही, तर निसर्गवर्णने माहितीपर व भौगोलिक वाटतात.

बिंदूची कथा, तुडवलेली घरं, शितू, पवनाकाठचा धोंडी, माचीवरचा बुधा, सिंधुकन्या या कादंबऱ्यांमुळे प्रकाशात आलेले गो.नि.दांडेकर हेही लांबलांबच्या प्रदेशातील जीवनसंस्कृती आविष्कृत करणारे लेखक. दांडेकर हे निसर्गवेडे होते. माचीवरचा बुधामध्ये निसर्गाचा मुक्त आविष्कार घडला आहे. बुधा मुंबईकर होतो. शेतीत रमलेले त्यांचे मन पुन्हा धावून माचीवर येते. डोळे अधू झालेले, शरीर थकलेले मातीत रमून जाते. बुधाचे मातीशी, भोवतालच्या सृष्टींशी, प्राणिजीवनाशी अतूट नाते निर्माण होते.

१९६० पर्यंत पेंडसे आणि दांडेकर हे प्रादेशिक साहित्यांची निर्मिती करणारे लेखक म्हणून पुढे आले, परंतु बनगरवाडी (१९५५), फकिरा (१९५९), धग (१९६०) या तीन कादंबऱ्या मात्र पुढे आल्या हा या काळाचा विशेष म्हणायला पाहिजे. हिरवाकच्च निसर्ग असतानाही निसर्गाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना पुढे आलेल्या कादंबऱ्या दरिद्री प्रदेशांतील दारिद्रयच प्रकट करणाऱ्या आहेत. दुर्दैवाने बनगरवाडी चा अपवाद सोडला तर दुसऱ्या दोन्ही कादंबऱ्यांची दखल मराठी समीक्षेने घेतलेली नाही. अर्थात फकिरा आणि धग या दोन कादंबऱ्यांना मराठी ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात फार महत्वाचे स्थान आहे. लोकजीवन आणि लोक संस्कृती, खेडयातील गावगाडा, बलुतेदार आणि गावकामगार यांचे संबंध यांचे मोठे समर्थ चित्रण फकिरामध्ये आहे. धग ही कादंबरीही अनेक अर्थांनी लक्षणीय आहे. ग्रामीण भागातील दारिद्रयांशी धैर्याने दोन हात करणाऱ्या असंख्य स्त्रियांचे प्रतिनिधित्व धगमधील कौतिक करते.

१९६० नंतर जी एकूणच मराठी कादंबरी बदलली तिचा पायरव या कादंबऱ्यांतून लागतो. (कोत्तापल्ले २००२, पृ.१५९) धग मुळे सामान्येति सामान्यांच्याही खिजगणतीत नसलेल्या व्यक्तिरेखा कादंबरीमध्ये येऊ लागलया.

अण्णाभाऊ साठयांनी चित्रा (१९५१), फकिरा, वैजयंता, माकडीचा माळ, आवडी, वैर, रानगंगा, पाझर, मास्तर, वारणेचा वाघ, चंदन, अलगुज, केवडयाचं कणीस, चिखलातील कमळ, इ. विपुल कादंबरीलेखन केलं. लोकमानसातील इतिहासाला कलात्मक सौष्ठव दिलं. फकिरा, वारणेचा वाघ, मास्तर या नायकांकडे पाहिले तर ते लोकमानसांमधीलच आहेत. पराक्रमी पुरुष लोकमानसाच्या ह्रदयसिंहासनात बसलेले असतात. अशा प्रकारचे मिथकात रुपांतर केले, तसेच लोकमानसाबरोबर आपल्या कथानकासाठी डबरी,गोसावी, माकडवाले, फासेपारधी यांना निवडून त्यांच्यात प्रेम फुलविले. परंतु "ग्रामीजवनाचे सखोल अवलोकन आणि आकलन असलेल्या या लेखकांच्या कादंबऱ्यांचा पुढे साचाच बनत गेला. त्यामुळे क्वचितच विषयांचे वेगळेपण दिसले तरी ते तात्पुरते राहिले." (रवींद्रः १९९३-९४)

"बारी"(१९५९), माझा गांव या रणजित देसायांच्या १९६० अखरे पर्यंतच्या कादंबऱ्या. गुन्हेगार ठरविलेल्या बेरडांवरची बारी आहे. माझ गांव ही कादंबरी स्वातंत्र्यपूर्वकाळात एक खेडे कसे होते, तेथील माणूस कसा जगत होता, खेडयांचा एकमेकांशी संबंध व संपर्क कसा होता,

त्यांचे दळणवळण कसे होते, संकट प्रसंगी ती माणसे एकमेकांना कशा पध्दतीने मदत करीत होती. त्यांच्यातील एकजूट या साऱ्या गोष्टी दाखविण्यासाठी माझ गांव त्यांनी लिहिला, ज्यातून जुन्या ग्रामव्यवस्थेची आणि ग्रामरचनेची कल्पना येते.

दि.बा. मोकांशी यांची देव चालले, (१९६१) शंकर पाटील यांची टारफुला (१९६४), हमीद दलवाई यांची इंधन (१९६५) या कीर्तिवंत लेखकांच्या एकेक कादंबऱ्या लक्षणीय ठरल्या. देव चालले मध्ये एकत्र कुटुंबाचा धर्म आणि देव हा धागा कालौघात क्षीण कसा होत गेला आणि हळूहळू आलेल्या आधुनिक जीवनशैली परंपरेला गिळायला सुरुवात झाली आणि खेडं काही मनात कोपऱ्यात पडून राहिलं आहे यांची ही कथा आहे. टारफुला या कादंबरीने प्रकाशित होण्याच्या आधीच अपेक्षा उंचावून ठेवली होती, परंतु लेखक कथाकार असल्याने कथेचा सुटेपणा कादंबरीला पेलवलेला नाही. व्यक्ती केंद्रस्थानी नसून गाव आणि गावातील सत्तासंघर्ष केंद्रस्थानी आहे. संघर्षात अन्य घटक, भावना,मानव्यपातळी गौण ठरते तेच याबाबतीत घडले आहे. इंधन ही मुळातच एका कार्यकर्त्याची कथा आहे. राष्ट्रवादी आणि पुरागोमी विचारांचा तरुण नायक आहे. आजारपणात विश्रांतीसाठी कोकणात येतो. गावाचे बदललेले रुप, हिंदू-मुस्लिम यांच्यात पडलेली ठिणगी, बौध्द-हिंदू यांच्यातील तणाव हे इंधन कादंबरीचे आशयद्रव्य आहे. ग्रामीण भागात अशा विचारांचे वारे कशा चुकीच्या पध्दतीने वाहत होते हे इंधनमध्ये दाखविले आहे.

चि.त्र्य. खानोलकर १९६० च्या दशकांतील पुन्हा एक मोठे प्रादेशिक कादंबरीकार. मुळ कविप्रवृत्तींचे कादंबऱ्यांतही त्यांच्या काव्यप्रवृत्तींचा प्रत्यय येतो. मानवी जीवनाला एका अगाध शक्तीने व्यापले आहे. त्यांचा शोध घेण्यासाठी खानोलकर कादंबरी लिहिताना दिसतात. रात्र काळी घागर काळी, अगोचर, भागधेय, पाषाण पालवी, कोंडुरा या कादंबऱ्यांत कोकण प्रदेश दाटीवाटीने आला आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील नायिका सौदर्यवती आहेत. हे सौदर्य त्यांना शापाप्रमाणे लाभले आहे तर पुरुष अमानवी शक्ती आणि अतिविकृतींनी झपाटलेले आहेत.हे सारे दाखवायचे तर कोकणातील गूढरम्य प्रदेश आलाच पाहिजे. गुहा, डोंगर, देवदेवता आणि गरीब समाज जीवन हे खानोलकरांच्या कादंबरीविश्वात भरुन राहिले आहे. म्हणून खानोलकरांनी रौद्रभीषण अशा निसर्गाची पार्श्वभूमी कादंबऱ्यांसाठी घेतली आहे.

"पाचोळा"(१९७१) रा.रं.बोराडे, गोतावळा (१९७१) आनंद यादव या दोन्ही चांगल्या कादंबऱ्या एकाच वर्षी प्रकाशित झाल्या. गोतावळा चे मुळ इंजेन कथेत आहे. तो अवकाश या कथेत बसलेला नव्हता म्हणून असमाधानातून गोतावळा निर्माण झाली. कुणब्यांचा गोतावळा बैलबारदाना, अवजारे असतात. आधुनिक दृष्टीकोन पारंपारिक शेतीत आला. परंपरेची शेतमशागत, नाडा-मोट, बैलगाडी, टॅक्टर, डिझेल इंजिन या गोष्टींची ओळख शेतकऱ्यांना होऊ लागली. तोपर्यंत कृषिसंस्कृती होती नंतर यंत्रव्यवहार झाला. नारबा रामू सोनावडे यांच्या शेतात गडी म्हणून कामाला लागतो. गोठयातल्या ढोरांत एक ढोर म्हणून मिसळून जातो. नारबाला जनावरे माणसांपेक्षा जवळची वाटतात. त्यांच्याशी त्यांचे भावसख्य निर्माण होते. कालातंराने यंत्रवापराने नारबाचे विश्व उद्ध्वस्त होते. नारबाची कामवासनासुध्दा जनावरांत प्रकट होते. तो शेतात राहून एकटे पडतो, पण जनावरात कामभावना प्रकट होऊन विकृती येत नाही. उलट कामभावनेविषयी वेगळे शरीरशास्त्र तो मांडतो-बाई आणि माणूस एकातच पाहिजे हुनं. यात त्यांचा कामाविषयीचा विचार आहे. जैवक तत्त्व तो शेतात राहून मांडतो. बैल, शेळया, मेंढया, आई, नकदी पिकी झाली. नारबा उद्ध्वस्त. प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणाले होते, की "आनंदरावांची गोतावळा कादंबरी वाचून आपण शेतकरी असल्याचे वाटू लागले"असे वाटावे एवढा शेतशिवार गोतावळामध्ये ओतला आहे. काळया आईकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. पिके, जनावरे हे गोतावळयाबाहेर, गुंतवळयाबाहेर घालून वाटेल तेव्हा पैसा मिळवण्याचे साधन झाले. गोतावळा ही पारंपारिक भारतीय कृषिसंस्कृतीच्या लिलावाची बोलीच ठरली.

पाचोळात ग्रामीण भागातील ईर्ष्या, अहंगंड, आपला वकूब ध्यानात न घेता झटण्याच्या प्रवृत्तीचे यथार्थ दिग्दर्शन घडते. धोतराला दिंड घालून दिले नाही म्हणून चिडलेला गरड गंगाराम शिपायाच्या व्यवसायालाच आव्हान देऊन गावात नवा फॅशनेबल शिंपी आणतो. ती नवी कला आपल्यालाही यावी हा गंगारामचा अट्टाहास आहे. पण नवतेची चाहूल लागते तेव्हा तो व्यावसायिक म्हणून गाफील राहतो. परंपरेचा व्यावसायिक विरुध्द धंदेवाईक नवव्यावसायिक अशी सद्यःस्थिती गंगारामसारख्या सामान्यांच्या बाबतीत उपस्थित होते. तो नवीन शिंपीकाम शिकण्यासाठी, पोराला शाळा सोडून शिकविण्यासाठी धडपडतो. जमत नाही त्या दोघांना. अतिरेकाने क्षयरोगी होतो आणि सर्व थांबते. यात ग्रामीण ते काय? असा प्रश्न पडू शकतो. आढयतेखोरपण, अहंगंड, ईर्ष्या या स्वभावदोषांना खोडून, बळी पडून ते मातीला मिळतात. हे अस्सल ग्राम्यदोष आहेत. धग पाचोळा मुळे ना.सी. फडके यांच्या सुंदर नायिका, देखणा कर्तृत्वान नायक आणि त्यांची असामान्य जीवनशैली यांस छेद मिळून सामान्यांच्याही खिजगणतीत नसलेले सामान्य जीव कादंबरी नायक-नायिका झाले ही ग्रामीण कादंबरीची देण म्हणायला पाहिजे.

महानोरांची गांधारी (१९७३), चंद्रकुमार नलग्यांच्या आगीन पूल (१९७४) गस्त (१९७६), महादेव मोरे यांच्या बळी (१९७२), वर आभाळ खाली धरती (१९७३) वस्ती (१९७५) प्रवाह (१९७६), शंकर खंडू पाटील यांचा घुंगरु (१९७१), कुलवती (१९७३), बेइमान (१९७६), सुभाष भेंडे यांचा जोगीण (१९७४) यांनी ग्रामीण जीवनानुभवाचे वेधक असे चित्रण केले आहे.

सारांश १९४७ ते १९७५ हा कालखंड स्वातंत्र्योत्तर कालखंड आपली नाती, आपली माणसं, आपल्या कल्पना, आपण अन् आपला विकास, देशाभिमान हा १९४७ पूर्वीचा आपला आदर्श होता. १९४७ नंतर परिस्थिती बदलली. भाकरी, भाग, भाषा यांच्यासाठी संघर्षास सुरुवात झाली. सुधारणा करायच्या कशा हा सत्ताधिशामोरील प्रश्न होता आणि दारिद्रय, भूकबळीतून सुटायचे कसे हा ग्रामीण भारतामधील प्रश्न होता. हा संघर्ष मराठीमधील लेखकांनी आपल्या आविष्कारात मुखर केला. परंतु वरवरचा, तकलादू सांगाडाच त्यांना दिसला. मुळांमुळे झाडंवेली डवरतात, फुलतात, फळतात. ती पाळेमुळे कळली नाहीत, दिसली नाहीत, कळली त्यांना सार्वजनिकतेचे, सार्वभौमत्वांचे नीट आकलन झाले नाही. सामाजिक प्रश्न महाकाव्यात्म प्रवृत्तींच्या माध्यमातून प्रकट झाला तर त्या समस्येची दाहकता, झळ वाचकांना बसून त्यांचे पर्यवसाने साहित्य, संस्कृती सजग होण्यात होते असे उदाहरण ग्रामीण कादंबरीत सापडत नाही.

एकंदरीत मराठी कादंबरीची संकल्पना पाहता तिला कथाकथनाची पार्श्वभूमी लाभली आहे. ही मराठी पंडिती वळणाची पंरपरा टिकविण्याची व कलाकुसरीसाठीची धडपड दिसते. संत तुकाराम मुळासकट महावृक्ष रांगडेपणाने तोलून धरतो किंवा प्रतिभेच्या जोरावर सारी आकाशगंगा ज्ञानेश्वर माऊली भाष्यात आणते. या आकाशखळयांच्या बाहेर सांडलेले दाणे वेचण्याच्या आनंदात मराठी कादंबरीकारांची प्रतिभा होती हे दिसते. त्यामुळे सीमित कुटुंबकथेपुरताच कादंबरीचा ताटवा फुलोरला. त्यामुळे ग्रामजीवनाच्या मुक्त पार्श्वभूमीच्या आखाडयात महाकाय कादंबरीकार निर्माण झालाच नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात जनतेचा भ्रमनिरस झाला. शिक्षणाचा प्रस्तर झाला. पण त्यांने जनमानसात अधिकच खोल दरी निर्माण झाली. या कालखंडातील कादंबरीची ओळख कुटुंबकथा, व्यक्तीकथा अशीच होते. दारिद्रय, दैन्य, अगतिक, केवळ ज्ञान क्षेत्रांतील अज्ञान नव्हे तर व्यावहारिक शहाणपणाचा अभाव सावकारी, ऐतखाऊपणा, महत्वाकांक्षा हीनता, यंत्रोपयोग, पारंपारिक त्यागातून आधुनिकतेची ओढ, ईहवादाचा चुकीचा अर्थ घेऊन भौतिकवादाचा मुनमुरादपणा वस्तुंऐवजी पैसा हे साधन प्रभावी इत्यादी आशय ठरले. पण विषय मात्र होऊ शकले नाहीत. राजकारण, कुटुंबकलह, भावकी हे अक्षरशः कादंबरीचे कलेवरच ठरले. या सर्वांचा परिणाम शहरांचा दु:सहय फुगवटा झाला. बकाल नागरीकरण अलीकडील समस्यांना कारणीभूत ठरत आहे.

संदर्भ :-

१.गो.मा. पवार, प्रतिष्ठान, कादंबरी विशेषांक, जाने. १९८१.
२.नागनाथ कोत्तापल्ले, गेल्या अर्धशतकातील ग्रामीण व प्रादेशिक कादंबरीचे यशापयशः गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी संपा. विलास खोले, लोकवाड्:मयगृह,२००२.
३. रवींद्र ठाकूर : मराठी ग्रामीण कादंबरी, मेहता पब्लिकेशन १९९३.